**प्रेसनोट दि ०४/०९/२०१९**

## दामिनी मार्शल भरोसा सेल,गुन्हे शाखा पुणे शहर
## गर्दीची फायदा घेवुन चोरी करणा-या महिलेस पकडले.

दामिनी मार्शल फरासखाना / वि.बाग म पो ना ६०३३ नरके, म पो शि १०८२० वडमारे असे मिळुन दि ०२/०९/२०१९ रोजी हद्दीमध्ये पेट्रोलींग करत असताना दु १४/३० वा चे सुमारास शनि मंदीर ,कसबा पेठ, शिवाजी रोड पुणे येथील गणपती स्टॉल चे समोर सार्वजनिक रोडवर एक महिला संशयीत महिला असल्याचा कंट्रोलचा कॉल होता. लागलीच आम्ही सदर ठिकाणी गेलो असता घडलेल्या प्रकाराबाबत विचारपुस केली असता कॉलर यांनी सांगीतले की, गणपती खरेदी करत असताना गर्दीमध्ये एका अज्ञात महिलेने मला पाठीमागुन धक्का देवुन माझे न कळत माझ्या हॅन्ड बॅग वर ब्लेड मारुण छोट्या पर्स मधील १०,०००/- रोख रक्कम व त्यातील ॲक्सेस बँक चे २ डेबीट कार्ड ,ड्रायव्हीग लायसन्स , लोबर कार्टातुन मिळालेल्या आय कार्ड ,पॅन कार्ड व इतर कागदपत्रे असे चोरले आहे. असे सांगीतल्यावर आम्ही सदर महिलेस कसबा पेठ चौकी येथे नेले. सदर महिलेस तीचे नाव पत्ता विचारला असता तिने तीचे नाव यशोधा सुनिल भगवाने वय ५० वर्षे असे सांगीतले. पुढील तपास कसबा चौकीचे प्रभारी अधिकारी हे करीत आहेत.

(विजया कारंडे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
महिला सहाय्य कक्ष, गुन्हे शाखा,
पुणे शहर

**प्रेसनोट ,** **दि ०४/०९/२०१९**

## दामिनी मार्शल भरोसा सेल,गुन्हे शाखा पुणे शहर
## गर्दीची फायदा घेवुन चोरी करणा-या महिलेस पकडले.

दामिनी मार्शल शिवाजीनगर/ खडक म पो शि ११११६८ आत्राम , म पो शि १९२० मुंडे, म पोशि ७९९५ वलेकर , म पो शि ७९२४ शेख असे मिळुन दि ०३/०९/२०१९ रोजी हद्दीमध्ये पायी पेट्रोलींग करत असताना तुळशिबाग येथे एक महिला संशयितपणे हालचाल करत असताना दिसुन आल्याने तिला तिचे नाव पत्ता विचारला इसता तिने तिचे नाव आसमा मुजाहेद सय्यदा वय ३३ वर्षे रा धंदा घरकाम रा १२७-३, धनगरवाडा पैठण ,बाजारवाड व अतर पैठण ता.पैठण जि औरंगाबाद असे सांगीतले.तिला सदप ठिकाणी येण्याचे कारण विचारले असता तिने उडवा उडवीची उत्तरे दिल्याने तिला विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे आणले असता वि.बाग पोलीस स्टेशन कडील पोलीस स्टेशन कडील महिला कर्मचारी यांच्या मदतीने व महिला पंचाच्या समक्ष बंद खोलीत तिची अंगझडती घेतली तिच्या कडे एक कापडी पिशवी ५९००/- रु रोख रक्कम , एक सॅमसंग कंपनी चा मोबाईल व एक छोटा कटर मिळुन आल्याने तिला विश्वासात घेऊन विचारले असता काही दिवसान पुर्वी मी दगडुशेट गणपती मंदीरा जवळ एका महिलेच्या पर्स मधील पैसे चोरले असल्याचे सांगुन त्यातील ५००/- रु खर्च केल्याचे सांगितले असता विश्रामबाग पोलीस स्टेशन कडील अभिलेखावर चोरी चा गुन्हा दाखल आहे का याची खात्री केली असता दिनांक १९/०८/२०१९ रोजी विश्रामबाग पोलीस स्टेशन गु.र.नं ३००/२०१९ भा.द.वि कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल आहे. म्हणुन पुढील योग्य त्या कारवाही साठी तिला विश्रामबाग पोलीस स्टेशन येथ्ील स्टाफ च्या ताब्यात दिले.

(विजया कारंडे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
महिला सहाय्य कक्ष, गुन्हे शाखा,
पुणे शहर